# श्री सद्गुरू सहजानंद सरस्वती





प्रकाशक :

**गुं. फ. आजगांवकर,**
३३६/२ भाई जीवनजी लेन,
ठाकूरद्वार, मुंबई–४०० ००२

सद्गुरू प्रभु विरचित

## भक्तिभाव पूर्वक समर्पण

श्री स्वामी समर्थ अक्कलकोट यांचे चरणी

मुद्रक :

**शरद कृष्णाजी सापळे**
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
३१, त्रिभुवन रोड,
मुम्बई–४०० ००४



श्री स्वामी समर्थ महाराज



श्री आनंदनाथ महाराज

# परम पूज्य सद्‌गुरु विठ्ठलराव गणेश जोशी महाराज

**महाराजांचा जन्म–**

आश्विन शुद्ध अष्टमी, १९१२ पोमेंडी गावी, जिल्हा रत्नागिरी.

**निर्वाण–**

रविवार २१ मे १९८९, वैशाख प्रतिपदा, कृष्णपक्ष, अनुराधा नक्षत्र, नारद जयंती.

महाराजांचे संपूर्ण चरित्र 'स्वामी समर्थ स्तवन गाथा' ह्या ग्रंथाच्या आरंभी दिले आहे. प्रसिद्धी १९९०

# श्री सहजानंद सरस्वती

## तथा परमपूज्य श्री विठ्ठलराव जोशी महाराज स्तोत्र

—: प्रारंभ :—

श्री गणेशाय नमः

श्री सरस्वत्यै नमः

श्री गुरुभ्यो नमः

श्री दत्तात्रेयाय नमः

श्री रामचंद्राय नमः

प्रथम नमूं श्री गणपती । ज्याचे चरण पुरुष प्रकृती । तैसीच करुणा मुर्ती । सुखदायी जयाचें वदन ॥१॥ गणेश दर्शन जया होई । त्यांचा संसार सुखी राही । परमार्थीही गोडी राही । विघ्नहर्ता नाम शोभतें ॥ २ ॥ पाहतां नर ना कुंजर । असे तो व्यक्त अव्यक्तापर । हें जाणोनी निर्विकार । तया नमन केले असे ॥३॥ सिद्धी विनायक तूं गणपति । स्तोत्र लिहिण्या दे मती । तूंची धरावी लेखणी हातीं । मी केवळ निमित्तमात्र ॥ ४ ॥ आतां नमूं श्री सरस्वती । जी असे बुद्धी, प्रकाशक शक्ती ।

तैशीच असे विवेक मूर्ती । बैसली जी सहजासनी ॥ ५ ॥ हे वाग्विलास परमेश्वरी । तुझी कृपा करी सत्वरी । स्तोत्र लेखना सहाय्य करी ! मज पामरा प्रकाश दे ॥ ६ ॥ नमन माझें सज्जनातें । जे उपासिती आनंदातें । दुःखी होती जन जेथें । धावती तेथे सत्वर ॥ ७ ॥ विनंती आता संताना । स्तोत्र लेखना द्या अवधाना । माझ्या अज्ञानी मना । उद्बोधन तुम्ही करा ॥ ८ ॥ सहजानंद सरस्वती यती । जोशी नामें ज्यांची ख्याती । भक्तां लेखना अभय देती । ऐसा निश्चय माझा असे ॥ ९ ॥

रत्नागिरी जिल्हा पोमेंडी गावीं । असे महाराज
जन्म भूमी । पिता गणेशाची कर्म भूमी । रामाचे
ते अनन्यभक्त ॥ १० ॥ धर्म परायण जानकी माता।
पोटी जन्म मिळे गणेशसुता । विठ्ठल नामकरण
होई आता । माता जानकी धन्य होई ॥ ११ ॥
परसेवा परोपकार । असे विठ्ठल आचार । ईश्वर
भक्तीचा नामोच्चार । बालवयांतही दिसे ॥ १२ ॥
बालपणी भगवत्भक्ती । तेणें त्यांना आली विरक्ती ।
देवा भेटाया अधीर होती ! विठ्ठल जोशी महाराज
॥ १३ ॥ प्रथम राम हनुमान उपासना । तदनंतर

दत्तोपासना । नंतर स्वरूप दर्शना । उपासूं लागले
महाराज ॥१४॥ प्रथम होई सद्गुरु शोध । ईश्वरो-
पासना घेई वेध । वासुदेवानंत करिती बोध । जोशी
महाराजांना ॥ १५ ॥ श्री क्षेत्र डेरवण । तालुका
असे चिपळुण । तेथिल जागृत हनुमान । संत
सीताराम समाधी असे ॥ १६ ॥ श्री शिव समर्थ
मंदीर । शिव समर्थ गड मनोहर । स्वामी असती
प्रज्ञा स्थीर । इतुके कार्य करोनी ॥ १७ ॥ समाज
सुधारणा त्यांचा बाणा । अर्थव्यवस्था कार्यकणा ।
विश्वस्त निधी योजना । सत्कारणी लागली

॥ १८ ॥ समाज सेवी जागृतता । सांस्कृतिक कार्यीं तत्परता । वेदोक्त कामीं अखंड परायणता । नामस्मरण रिक्तवेळीं ॥ १९ ॥ त्याग वृत्ती स्थायी भाव । भक्तांसाठीं घेती धाव । अंतर्यामी अभेद भाव । स्वामी वागती करुणेनें ॥ २० ॥ स्वतः चमत्कार न करिती । परि चमत्कार होत असती । ही त्यांच्या सान्निध्याची महती । अनेक लोक सांगती ॥२१॥ त्यांच्या भेटी संतजन येती । सत्पुरुष स्वामी सन्यासी यती । गुरुकृपें सानमहान जमती । त्यांचें दर्शन घेण्यास्तव ॥ २२ ॥ आता सांगतो

गुरुपरंपरा । जेणें आला परमार्थ घरा । व्यवहार परमार्थ होई खरा । धन्य झाले स्वामीजी ॥ २३ ॥
प्रथम अवतार श्रीपाद यती । तदनंतर नरसिंह सरस्वती । स्वामी समर्थ तृतीयावतार असती । चतुर्थावतार टेंबेस्वामी ॥ २४ ॥ ते स्वामी समर्थ यती । बिडकरांना अनुग्रह देती । निजबोधाची किल्ली सांगती । धन्य धन्य ते बिडकर ॥ २५ ॥
बिडकर भेटती बाबांना । सहस्त्रबुद्धे म्हणती ज्यांना। अनुग्रह देती त्यांना । ते होती समतानंत ॥ २६ ॥
समतानंत सरस्वती । विठ्ठलाते अनुग्रह देती ।

स्वरूप संप्रदाय शिकविती । विठ्ठल सहजानंदांना ॥ २७ ॥ सोहंकारें अद्वैतानंद । जोशी झाले सहजानंद । प्रपंच परमार्थी असती रत । दुजें कांहीं न मानिती ॥ २८ ॥ प्रपंच त्यांचा विश्वाचा । परमार्थ त्यांचा अनंताचा । द्वैतभाव नसे त्यांचा । परमात्मा एक मानिती ॥२९॥ श्रीगुरु दत्त परंपरा । त्यांना मिळे उपासनेद्वारा । तिचें पालन लहान थोरां । त्यांनी करावया शिकविलें ॥ ३० ॥ पुण्य नगरी स्वामी येती । गुरुसमाधी तेथें बांधती

त्या कार्याची महती । लोकां आकळे हळूहळु ॥ २१ ॥ समाधी मंदिरी रुद्रपवमान । गणपति अथर्वशीर्ष पठण । श्रीसुक्त सप्तशती पाठवाचन । नित्य होऊं लागले ॥ ३२ ॥ श्रीगुरु लीलामृत ग्रंथ । मन्युसुक्त नवनाथ ग्रंथ । श्रीमद् भागवतादी ग्रंथ । पारायण होऊं लागले ॥ ३३ ॥ त्यांची शाखा सरस्वती । अवधूत पंथीय गुरुयती । सगुण निर्गुण एकत्व प्रचिती । देती सहजानंदांना ॥३४॥ प्रतिभा अखंड जागृत । ज्ञान भक्ती संतत ।

परमार्थ लेखन होई अव्याहत । गुरुनिष्ठेच्या
कृपेनें ॥ ३५ ॥ कार्य करिती योजनाबद्ध । योग्य
साधने उपयोजित । लोकां दिलेला शब्द । अचूक
ते पाळीत ॥ ३६ ॥ कर्तव्य कर्मातें त्वरा करा ।
परमेश्वरातें अखंड स्मरा । नामस्मरणातें अनुसरा ।
स्वामी लोकां सांगती ॥ ३७ ॥ विद्याभ्यास करावा
मुलांनी । मार्गदर्शन करावें गुरुजनानी । पालकांशी
संपर्क साधोनी । कार्यं सफल करावें ॥ ३८ ॥
प्रपंच परमार्थ जे करिती । स्वामी आशीर्वादतयां
मिळती । त्यांनी टाकलें पाऊल पुढती । दातृत्व

सामोरी ठेवोनी ॥ ३९ ॥ राष्ट्रधर्म समाजधर्म ।
देवधर्म कार्य नेम । वैदिक धर्म आचरोन । तयारी
केली निर्वाणाची ॥ ४० ॥ एकोणिसशें अकरा
शालिवाहनीं । प्रतिपदा, रविवार दिनीं ॥ अनुराधा
नक्षत्र, उत्तरायणीं । महानिर्वाण जाहलें ॥ ४१ ॥
धन्य धन्य महाराज । किर्ती गाती लोक आज;
सहजानंद कार्य काज । पुढे चालू राही तें ॥४२॥
या स्तोत्राचे नित्य वाचन । प्रातःकाली मन
लावून । जे करिती त्यांची इच्छापूर्ण । स्वामी
महाराज करतील ॥ ४३ ॥ भाविक हो उठा उठा ।

पुण्य नगरीं त्यांना भेटा। सत्कार्याचा वाढेल साठा। स्वामी दर्शन झाल्यावरी ॥ ४४ ॥ मनीं जी इच्छा धराल। ती ती फळा येईल ! स्वरूप दर्शन स्थिरेल। कृपाशिर्वादें स्वामींच्या ॥ ४५ ॥ षण्मासांत प्रचिती मिळे। भाविकांना ती निश्चित कळे। स्तोत्र महती तया आकळे। सद्गुरु प्रभु सांगतसे ॥ ४६ ॥

॥ इति श्रीराम प्रेरणया सद्गुरु प्रभु विरचित पूज्य श्री. जोशी महाराज तथा सहजानंद सरस्वती स्तोत्र संपूर्णम् ॥

–सद्गुरू प्रभू

## आनंदनाथ महाराज कृत—

**( १ ) स्वामी समर्थ स्तवन गाथा,** **किंमत रु २१०**

प्रष्ठे ६०० कापडी बायडिंग. रंगीत छायाचित्रें,
सोबत श्री. सद्गुरु विठ्ठलराव जोशी महाराज
यांचे चरित्र.

---

**( २ ) श्री पद्मनाभतीर्थ महाराज व दत्त संप्रदाय ( बाडमठ )**

**किंमत रु. ६०**

---

**( ३ ) आज्ञार्थी गीता—व. दि. कुळकर्णी** **किंमत रु १५**

---

**( ४ ) जयमहाराष्ट्र ! ( पवाडा ) न. शे. पोहनेरकर,**

( सुवर्ण पारितोषिक मिळालेला ) सं. : गुं. फ. आजगांवकर,
३३६/२ भाईजीवन लेन, मु. २,